नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०२ Issue - 102 | वार - शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ Blow- Saturday Date 5 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## इस्रोने केले ईओएस-०५ रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण

### ३६००० किमी वरून ठेवणार भारतावर सुरक्षेची करडी नजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीहरीकोटा : मध्यरात्री भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने इतिहास रचला आहे. ईओएस-०५ या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले. हे उपग्रह ३६०००० किमी अंतरावरून भारतावर करडी नजर ठेवणार. हे उपग्रह महत्वाची माहिती भारताला पुरवेल. हे प्रक्षेपण श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण पॅडवरून GSLV-F17 रॉकेटच्या मदतीने करण्यात आले. या उपग्रहाला 'Eye in sky' असे एका वरिष्ठ शास्त्रज्ञाने वर्णन केले आहे.



देश झोपेत असतांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने इतिहास रचला. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण पॅडवरून GSLV-F17 रॉकेटच्या मदतीने पृथ्वी निरीक्षण उपग्रह-०५ (EOS-05) चे यशस्वी प्रक्षेपण केले. पृथ्वी निरीक्षण उपग्रह एजड-०५ ला GSLV-F17 या प्रक्षेपण वाहनाने उप-भूस्थिर संक्रमण कक्ष मध्ये अचूकपणे स्थापित केले. हे प्रक्षेपण ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी २ वाजून ५५ मिनिटाला झालं.

EOS-05 हा पृथ्वीपासून सुमारे ३६००० किलोमीटर उंचीवरून फोटो काढणारा उपग्रह आहे. हा भारताचा पहिलाच असा कॅमेरा-उपग्रह आहे जो एवढ्या उंचीवरून फोटो काढेल. हा कॅमेरा एवढ्या उंचीवर असल्याने तो पृथ्वीच्या वेगानेच फिरतो. यामुळे भारतावर २४ तास सतत लक्ष ठेवणार. GSLV-F17 या प्रक्षेपण वाहण्यात पाठवण्यात आलेला सर्वाधिक वजनाचा उपग्रह आहे. त्याचं वजन २३६७ किलो आहे.

EOS-05 हा कॅमेरा शेतीच निरीक्षण, चक्रीवादळ, पूर, ढगफुटी, सीमेवरील हालचाल अशा देशाच्या सुरक्षितेसाठी महत्वाच्या माहितीचे श्रळींश फोटो पाठवणार. आतापर्यंत आपले उपग्रह कमी उंचीवरून फोटो काढायचे. म्हणजे ६०० किमी अंतरावरून फोटो काढायचे. त्यामुळे २४ तासातून एकदाच आपल्याला फोटो मिळत होते. मात्र आता हा कॅमेरा ३६०००० किमी वरून आपल्याला भारतावर २४/७ करडी नजर ठेवणार आहे. हे उपग्रह ९ वर्ष काम करणार. या उपग्रहाला 'Eye in sky' असे एका वरिष्ठ शास्त्रज्ञाने वर्णन केले आहे.

इस्रो प्रमुख डॉ. व्ही. नारायणन म्हणाले की, मला हे जाहीर करतांना अत्यंत आनंद होत आहे की, GSLV F-17 या प्रक्षेपकाने एजड-०५ या जिअ-ो-इमेजिंग उपग्रहाला त्याच्या नियोजित आणि आवश्यक कक्षेत यशस्वीरीत्या व अचूकपणे स्थापित केले आहे. एजड-०५ हा कार्यान्वित झाल्यानंतर भूस्थिर कक्षेतून कार्य करणारा भारताचा पहिला समर्पित इमेजिंग उपग्रह ठरणार आहे. हे उपग्रह महत्वाचे 'स्ट्रॅटेजिक डाटा' भारताला पुरवेल अशी अपेक्षा आहे.

मिशन डायरेक्टर थॉमस कुरियन यांनी सांगितले की, GSLV-F17 हे प्रक्षेपण वाहन ५१.७ मीटर उंच असून त्याचे लिफ्टऑफ वजन ४२०.५ टन आहे. त्यामुळे हे भारतातील कार्यरत असलेल्या सर्वात मोठ्या प्रक्षेपण वाहनांपैकी एक आहे. या एजड 'निअर रिअल-टाइम' फोटो घेण्यास सक्षम आहे. GSLV द्वारे GTO qH$dm sub-GTO कक्षेत प्रक्षेपित केलेला हा आतापर्यंतचा सर्वात जड उपग्रह आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रकल्प संचालक इम्तियाज अहमद यांनी EOS-05 चे वर्णन 'मल्टी-बँड' कार्य करण्याची क्षमता असलेला एक अद्वितीय आणि वैशिष्ट्यपूर्ण उपग्रह असे केले आहे. त्याची रचना, यंत्रणा आणि कार्य क्षमता या दृष्टीने हा एक गुंतागुंतीचा उपग्रह आहे. प्रक्षेपणाची प्रक्रिया बुधवारी रात्री ११:३० वाजता सुरु झाली. २७ तासांची सुरळीत 'काऊंटडाऊन' पूर्ण झाल्यानंतर सतीश धवन अंतराळ केंद्रावरील दुसऱ्या प्रक्षेपण मंचावरून पहाटे २:५५ वाजता या रॉकेटने आपली झेप घेतली. पहाटेची वेळ आणि पाऊस असूनही प्रक्षेपणाचा आनंद घेण्यासाठी अनेक नागरिक छत्री घेऊन मोठ्या संख्येने तिथे उपस्थित होते. त्यांचा उत्साह कमी न होता ते प्रोत्साहन देण्यासाठी तिथे उपस्थित होते.

पंतप्रधाननरेंद्र मोदींनी ISRO चे अभिनंदन केले आहे. त्यांनी GSLV-F17 आणि एजड-०५ ही मोहीम यशस्वी प्रक्षेपण झाली. ही कामगिरी देशासाठी अभिमान असल्याचे म्हटले आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील उत्कृष्टता, नवकल्पना आणि वाढत्या क्षमतांचे हे प्रतिबिंब असल्याचे मोदी यांनी नमूद केले. इस्रो आणि भारतीय खासगी उद्योजक क्षेत्रातील वाढती पार्टनरशिप हे नवीन बळ आणि व्यापकता मिळत असल्याने संपूर्ण अंतराळ परिसंस्थेमध्ये क्षमता वाढत आहे.

## बोगद्यातून आवाज आला अन् नेपाळमध्ये चमत्कारिक घटना; तब्बल ९ दिवसांनंतर दोघांची सुटका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काठमांडू: नेपाळमध्ये २६ ऑगस्टला आलेल्या भीषण पुराला ९ दिवस होऊन गेले आहेत. यानंतर त्रिशुली-३ ए जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यातून २ जणांना जिवंत बाहेर काढण्यात यश आलं आहे. मॅकेनिक फोरमन संजय साह आणि मॅकेनिकल सुपरवायझर कबीर महाजन अशी दोघांची नावं आहे. शुक्रवारी संजय साह यांची सुटका झाली. त्यानंतर कबीर महाजन यांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं. तब्बल ९ दिवसांनंतर दोघेही चमत्कारिकपणे बचावले आहेत.

नवव्या दिवशी बोगद्यात बचाव कार्य सुरू असताना 'हुन्छा' असा आवाज आला. त्यामुळे बचाव पथकानं वेगवान हालचाली सुरू केल्या. माणसांचे आवाज ऐकताच मदत कार्य करणाऱ्या पथकानं आत अडकलेल्यांना धीर दिला. 'घाबरू नका, आम्ही तुम्हाला वाचवायला आलोय,' असं बचाव पथकाकडून सांगण्यात आलं. तेव्हा बोगद्याच्या आतून प्रतिसाद मिळाला.

नेपाळी सैन्य आणि सशस्त्र पोलीस दलानं ऑपरेशनला वेग देत बोगद्याच्या आत असलेल्यांशी संपर्क साधल्याची माहिती नेपाळचे खासदार राम नेऊपाने यांनी दिली.

बोगद्याच्या आत आणखी काही जण अडकले असल्याची शक्यता बचाव पथकाला वाटते. त्यामुळे त्यांचा शोध घेतला जात आहे.

२६ ऑगस्टला आलेल्या भीषण पुरानं नेपाळमध्ये हाहाकार माजवला. या नैसर्गिक आपत्तीमध्ये आतापर्यंत १,२५२ जणांचा जीव गेला आहे. अनेक जलविद्युत प्रकल्पांसह प्रमुख रस्त्यांची वाताहत झाली आहे. अवघड परिस्थितीत बचाव पथकं बोगद्यांमध्ये अडकलेल्या कामगारांचा शोध घेत आहेत.

२६ ऑगस्टला आलेल्या भीषण पुरात नेपाळच्या अनेक भागांचं नुकसान झालं. पुराच्या थैमानाचा सर्वाधिक फटका जलविद्युत प्रकल्पांना बसला. देशातील १२ जलविद्युत प्रकल्पांमधील ९०० हून अधिक कामगार बेपत्ता झाले. यातील बहुतांश कामगार बोगदे आणि जमिनीच्या खाली तयार करण्यात आलेल्या भागांमध्ये अडकले असल्याची भीती आहे.

रसुवा आणि नुवाकोटमध्ये पुराचा फटका बसलेल्या जलविद्युत प्रकल्पांमधील जवळपास ५०० कामगार बोगद्यांमध्ये अडकले असण्याची दाट शक्यता आहे. पूर येताच काही कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी साद घातली होती. काही कामगार बाहेर पडण्यात यशस्वी ठरले. बोगद्यांमधील ऑक्सिजनचं प्रमाण कमी होत असल्यानं बचाव पथकांसमोर आव्हानात्मक स्थिती निर्माण झाली आहे.

## मुसळधार पावसाने दिल्ली विमानतळ पाण्याखाली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, त्याचा मोठा फटका दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला बसला आहे. पावसानंतर विमानतळाच्या प्रवेशद्वाराबाहेर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याचे समोर आले आहे. जमिनीवर साचलेल्या पाण्यात प्रकाशाचे किरण परावर्तित होत असल्याचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले असून, या पाण्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

विमानतळ परिसरात साचलेल्या पाण्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली. अनेक प्रवासी पेंट/पायजमा दुमडून पाण्याच्या मधूनच आपल्या ट्रॉली ढकलत ॲराइव्हल (ीर्ळींरश्र) गेट्सच्या दिशेने जाताना दिसले. मी गेल्या अर्ध्या तासापासून येथे उभी आहे आणि पाणी थोडे ओसरण्याची वाट पाहत आहे. असा प्रकार मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता, अशी प्रतिक्रिया मानसी आणि हिमांशी या महिला प्रवाशांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. कृष्ण जन्माष्टमीच्या सणादरम्यानच पाऊस पडल्याने प्रवाशांची धावपळ अधिकच वाढली.

## सोलापुरात ८६ वर्षांच्या माजी नगरसेवकावर हल्ला, २५ वर्षांपूर्वीच्या वादाच्या रागातून आरोपीचं कृत्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापुरातील अतिशय उच्चभ्रू सोसायटीत गुरुवारी सायंकाळी थरारक घटना घडली. सिंधी समाजाच्या एका कार्यक्रमासाठी गेलेले माजी नगरसेवक तथा सिंधी समाजाचे माजी अध्यक्ष लालचंद नमोमल वाधवाणी यांच्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करुन त्यांना गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना गुरुवारी सायंकाळी सोलापुरातील गुरुनानक चौक परिसरारील सिंधी कॉलनीत घडली. या घटनेतील जखमी लालचंद वाधवाणी हे ८६ वर्षांचे आहेत. ते सोलापुरात लक्ष्मी विष्णू सोसायटीत वास्तव्यास आहेत. त्यांच्यासोबत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या हल्ल्यामागचे कारणदेखील आता समोर आले आहे. सिंधी समाजातीलच ६५ वर्षीय प्रकाश किसनदास अडवाणी या इसमाने २५ वर्षांपूर्वीच्या वादाचा राग मनात धरून हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. जखमी लालचंद वाधवानी यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर संशयित आरोपी प्रकाश अडवाणी याच्या विरोधात सदर बजार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता १०९ (१), ३५२ (३) शस्त्र अधिनियम ४, २५ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. सिंधी समाजातील एका व्यक्तीच्या उठावणाचा कार्यक्रम गुरुनानक चौक परिसरातील सभागृहात गुरुवारी सुरू होता. वाधवाणी यांच्यासह अनेक समाजबांधव तिथे उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतानाच आरोपी प्रकाश अडवाणी दुचाकीवर तिथे आला. त्याने सोबत लांब धारदार शस्त्र आणले होते. कसलाही विचार न करता त्याने वाधवाणी यांना खाली ढकलून पायावर जोरदार वार केले. यात वाधवाणी गंभीर जखमी झाले. उपस्थितांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि एकच गोंधळ उडाला. उपस्थित काही जणांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला असता तो हातातील शस्त्र घेऊन तिथून निघून गेला. जखमी वाधवाणी यांना उपस्थितांनी रक्तबंबाळ अवस्थेत तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

२५ वर्षांपूर्वी सिंधी समाजाच्या पातळीवर झालेल्या एका निर्णयावरून प्रकाश अडवाणी याच्या मनात तीव्र राग होता. त्यातूनच हा हल्ला झाल्याचा संशय आहे. हा हल्ला पूर्वनियोजित होता का? याचा शोध पोलीस घेत आहेत. भर कार्यक्रमात घडलेल्या या प्रकारामुळे सिंधी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलीस ठाण्याचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत.

**अवयवदानात महाराष्ट्राची उल्लेखनीय घोडदौड; हजारो रुग्णांना मिळाले नवजीवन**

## अवयवदानाबाबत राज्यभर व्यापक प्रबोधन मोहीम राबवा : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंमलात आल्यापासून आणि २०११ व २०१४ मधील सुधारित कायद्यांनुसार राज्यात अवयवदानाचा आलेख सातत्याने उंचावत असून हजारो रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. राज्य शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रादेशिक अवयव व उती प्रत्यारोपण समन्वय संस्था तसेच मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे राज्यभरात अवयवदानाबाबत मोठी सकारात्मकता दिसून येत आहे. यामुळे राज्यभर व्यापक अवयवदान प्रबोधन मोहीम राबविण्याचे आवाहन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

राज्यात १९९५ पासून ऑक्टोबर २०२६ पर्यंत झालेल्या अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियांची आकडेवारी पाहिल्यास या क्षेत्रात मोठे यश मिळाल्याचे दिसून येते. या कालावधीत एकूण १७,३२५ जिवंत व्यक्तींमधील अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पडल्या असून त्यामध्ये १४,९४९ मूत्रपिंड (किडनी) आणि २,३७६ यकृत (लिव्हर) प्रत्यारोपणांचा समावेश आहे. तसेच मरणोत्तर अवयवदानातून एकूण ३,३७३ गरजू रुग्णांना नवीन आयुष्य मिळाले आहे. यामध्ये १८५३ मूत्रपिंड, ९८७ यकृत, २२० हृदय, ६३ फुफ्फुस आणि नेत्र व उतींसह २५० इतर अवयवांच्या यशस्वी रोपणाचा समावेश आहे. सध्या राज्यात विविध अवयवांसाठी प्रतीक्षारत असलेल्या रुग्णांमध्ये मूत्रपिंडासाठी ४०७५, यकृतासाठी ८८८, हृदयासाठी ६३, फुफ्फुसासाठी २४, स्वादुपिंडासाठी १५, हातासाठी ११ आणि लहान आतड्यासाठी ८ रुग्ण प्रतीक्षेत आहेत, ज्यांच्यासाठी अवयवदानाचे आवाहन सातत्याने केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

नागरिकांमध्ये प्रबोधन घडवून आणण्यासाठी केंद्र शासनाच्या 'अंगदान-जीवन संजीवनी अभियाना'चा भाग म्हणून महाराष्ट्रात ३ ऑगस्ट २०२६ ते १५ ऑगस्ट



२०२६ दरम्यान 'जुगजुग जियो अभियान' मोठ्या उत्साहात राबवण्यात आले. यासोबतच २ ते १५ ऑगस्ट २०२६ दरम्यान संपूर्ण राज्यात 'अवयवदान पंधरवडा' पाळण्यात आला, ज्या अंतर्गत १३ ऑगस्ट २०२६ रोजी १६ वा अवयवदान दिन साजरा करण्यात आला. या मोहिमेदरम्यान राज्यभरात संगणकीय माहिती पुस्तिकेचे प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारण करण्यात आले. तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी, प्रसिद्ध व्यक्ती आणि धर्मगुरू यांचे संदेश दूरचित्रफितींच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले, तसेच अवयव प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या प्रेरणादायी मुलाखती प्रसारित करण्यात आल्या.

नागरिकांना सहजरीत्या सहभाग नोंदवता यावा यासाठी अधिकृत संकेतस्थळाद्वारे व क्यूआर कोडच्या साहाय्याने अवयवदान प्रतिज्ञा नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याद्वारे राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी अवयवदानाची शपथ घेतली आहे. आरोग्य यंत्रणेतील तळागाळातील घटकांना सक्रिय करण्यासाठी जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील कार्यरत वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचाऱ्यांसाठी विशेष व्याख्याने आयोजित करून त्यांच्याकडून अवयवदानाचे अर्ज भरून घेण्यात आले. युवा पिढीमध्ये याचे महत्व रुजवण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये अवयवदान प्रबोधन फेरी, चित्रकला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय, शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये प्रबोधनपर फलक व भित्तिपत्रके लावण्यात आली, तर दरवर्षीप्रमाणे अवयवदान करणाऱ्या दात्यांच्या कुटुंबांचा विशेष सन्मान करून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

शासकीय पातळीवर अवयवदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी पथनाट्ये, चित्रपटगृहांमधील जाहिराती, आकाशवाणीवरील संदेश, परिसंवाद आणि लघुपट प्रदर्शनाद्वारे 'महाअवयवदान महोत्सव' यशस्वीरीत्या राबवण्यात आला. या सर्वसमावेशक प्रयत्नांमुळे राज्यातील अवयवदानाविषयीच्या अंधश्रद्धा दूर होऊन एका नव्या सामाजिक क्रांतीची सुरुवात झाल्याची माहितीही मंत्री आबिटकर यांनी दिली.

## संपादकीय....

### व्यापक प्रबोधन

महाराष्ट्रात मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंमलात आल्यापासून आणि २०११ व २०१४ मधील सुधारित कायद्यांनुसार राज्यात अवयवदानाचा आलेख सातत्याने उंचावत असून हजारो रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. राज्य शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रादेशिक अवयव व उती प्रत्यारोपण समन्वय संस्था तसेच मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय अवयव प्रत्यारोपण सम न्वय केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे राज्यभरात अवयवदानाबाबत मोठी सकारात्म कता दिसून येत आहे. यामुळे राज्यभर व्यापक अवयवदान प्रबोधन मोहीम राबविण्याचे आवाहन नुकतेच आरोग्यमंत्र्यांनी केले आहे.  नागरिकांमध्ये प्रबोधन घडवून आणण्यासाठी केंद्र शासनाच्या 'अंगदान-जीवन संजीवनी अभियाना'चा भाग म्हणून महाराष्ट्रात ३ ऑगस्ट २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'जुगजुग जियो अभियान' मोठ्या उत्साहात राबवण्यात आले. यासोबतच २ ते १५ ऑगस्ट २०२६ दरम्यान संपूर्ण राज्यात 'अवयवदान पंधरवडा' पाळण्यात आला, ज्या अंतर्गत १३ ऑगस्ट २०२६ रोजी १६ वा अवयवदान दिन साजरा करण्यात आला. या मोहिमेदरम्यान राज्यभरात संगणकीय माहिती पुस्तिकेचे प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारण करण्यात आले. तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी, प्रसिद्ध व्यक्ती आणि धर्मगुरू यांचे संदेश दूरचित्रफितींच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले, तसेच अवयव प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या प्रेरणादायी मुलाखती प्रसारित करण्यात आल्या.

## निशू आझादच्या वडिलांना मारहाण करणारा स्वतंत्र भारद्वाज दिल्ली पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सीजेपीनं नीट पेपरफुटीवरुन केलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या निशू आझाद हिच्या वडिलांना मारहाण करणाऱ्या स्वतंत्र भारद्वाजच्या एका पॉडकास्टम ुळं नवा वाद निर्माण झाला आहे. निशू आझादनं काल एक व्हिडिओ पोस्ट करुन लोकसभेतील विरोधी पक्ष-नेते राहुल गांधी यांच्याकडे न्यायासाठी मदतीची मागणी केली होती. स्वतंत्र भारद्व-ाज यानं एका पॉडकास्टमध्ये निशू आझादच्या वडिलांच्या डोक्याला दुखापत केल्याचं सांगितलं होतं. स्वतंत्र भारद्व-ाज स्वत:ला सनातन योद्धा म्हणवून घेतो. राजकीय संरक्षण असल्यानं तुरुंगात गेलो नाही, असंही त्यानं सांगितलं आहे. स्वतंत्र भारद्वाज याला दिल्ली पोलिसांनी उत्तर प्रदेशच्या बुलंदशहरमधून ताब्यात घेतलं आहे. भारद्वाज यानं व्हिडिओत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यावरुन कोणती कलम लागू शकतात आणि किती वर्षांची शिक्षा होऊ शकते ते जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

सर्वात गंभीर कलमांपैकी एक म्हणजे भारतीय न्याय संहितेचं कलम १०९ आहे. हे कलम हत्येच्या प्रयत्नासंदर्भात आहे. हे कलम लागू करण्यासाठी पोलिसांना घटनेच्या मागील उद्देश किंवा माहिती सिद्ध करावी लागेल. हल्ला जिवे मारण्याच्या इराद्यानं केला गेला होता हे सिद्ध झालं किंवा जोरात वार केल्यानं जखमी व्यक्तीचा मृत्यू झाल्यास हे कलम लागू होतं. या कलमानुसार १० वर्षांचा कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. हल्ल्यात गंभीर दुखापत झाल्यास कायद्यानुसार जन्मठेप होऊ शकते. न्यायालय हल्लेखोराच्या स्थितीचा आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करुन निर्णय देऊ शकते.

भारतीय न्याय संहितेचं कलम ११७ (२) धोकादायक शस्त्रानं किंवा जाणीवपूर्वक गंभीर इजा पोहोचवण्यांदर्भात आहे. लोखंडी कड्यानं म ारल्याचं स्वतंत्र भारद्वाज यानं सांगितलं आहे. त्यानुसार गंभीर दुखापत केल्याचं स्पष्ट झाल्यानं हे कलम देखील लावलं जाऊ शकतं. या कलमानुसार १० वर्षांचा कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. हे सिद्ध करण्यासाठी वैद्यकीय अहवाल महत्त्वाचा असेल. स्वतंत्र भारद्वाज यांनी संजयकुमार आझाद यांना मारहाण जंतरमंतर वर आंदोलनावेळी केली होती. यामुळं वाद किंवा दंगल निर्माण करणे यासंदर्भात कलमांचा देखील विचार केला जाऊ शकतो. भारतीय न्याय संहितेच्या कलम १९१(२) चा वापर देखील केला जाऊ शकतो, यात २ वर्षापर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे. दंगल किंवा वाद निर्माण करण्यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीकडे शस्त्र असतील तर त्याच्यावर कलम १९१ (३) लावलं जाऊ शकते. यामध्ये ३ वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो.

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि सम ाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्म विश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असत-ो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्स-ाहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिम त्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्त-रे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती आ-ेळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा सम तोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणा-चा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला म दत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रव-ाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमि का बजावतो.

ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जी-वनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागा-तील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञ-ासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये अस-लेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना सम ान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.

या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.

पर्यावरणीय संकटे, पाण्याची सम स्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.

शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि म ूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर सम ाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजे-चे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हा-तात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्म ान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागा-तील शाळांना आवश्यक सुविधा मि ळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मि ळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल –** bagate.rajendra5@gmail.com

# मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त मंगळवेढा शहरातील गणेश उत्सव मंडळाची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – दिनांक३/९/२०२६ रोजी मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे आगामी गणपती उत्सवाच्या अनुषंगाने सकाळी दहा वेळेत मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा श्री शिव पूजे साहेब, नायब तहसी-लदार स्वामी मॅडम, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे पाटील साहेब, टॅक्सी इन्स्पेक्टर धुमाळ साहेब, नगरपालिकेचे कांबळे मॅडम तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थ-ापत्य अभियांत्रिकी सहाय्यक





गायकवाड साहेब, तसेच मंगळवेढा पोलीस ठाणे कडील अधिकारी अंमलदार यांच्या उपस्थितीत मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीतील गणपती मंडळाचे पदाधिकारी व पोलीस पाटील शांतता कमिटीचे पदाधिकारी विविध राजकीय पक्ष संघटनेचे पदाधिकारी यांची तालुकास्तरीय शांतता मीटिंग घेऊन त्यांना सदर उत्सवाच्या अनुषंगाने माननीय वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या सूचना प्रमाणे सूचना देऊन योग्य तो मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

मुंगळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे, पोलीस निरीक्षक मंगळा पोलीस ठाणे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ मंगळवेढा कडकडीत बंद

## समाज बांधवांनी एकजुटीने पाठिंबा देत शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने मांडली भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी मंगळवेढा शहर व तालुका कळकळीत बंद ठेवण्यात आला. या बंदला शहरातील व्यापारी , व्यावसायिक, दुकानदार तसेच नागरिकांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज दादा जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनाच्या समर्थ नार्थ मंगळवेढात गेल्या काही दिवसापासून विविध उपक्रम राबवण्यात येत होते या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज मंगळवेढा शहर व तालुका यांच्या वतीने बंदचे आव्हान



करण्यात आले होते.

शुक्रवार दिनांक ४/ ९ /२०२६ रोजी सकाळपासूनच शहरातील प्रमुख बाजारपेठा, दुकाने आणि विविध व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या. त्यामुळे नेहमी गजबळलेल्या प्रमुख रस्त्यावर व बाजारपेठेत शांतता दिसून आली. अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःहून दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शवला,

यापूर्वी दामाजी चौक येथे मराठा समाजाच्या बांधवांनी बैठक घेण्यात आली होती तसेच मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी ठिय्या आंदोलन, रस्ता रोको, बंद याबाबत समाज बांधवांमध्ये जनजागृती करण्यात आली होती.

या आंदोलनाच्या दरम्यान मराठा आरक्षण मिळालेच पाहिजे मनोज दादा जरांगे पाटील आगे बढो हम तुम्हारे साथ है 'अशा घोषणाही देत आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

मंगळवेढा शहरातील विविध भागात मराठा समाजाचे कार्यकर्ते, युवक समाज बांधव बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय होते.

कोणत्याही अनुचित प्रकार घडून येण्यासाठी प्रशासन व पोलिसाकडून ही आवश्यक खबरदारी घेण्यात आली व मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला मंगळवेढा येथील समाज बांधवांनी एकजुटीने पाठिंबा देत शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने आपली भूमिका मांडली. बंदच्या माध्यमातून मराठा आरक्षणाच्या मागणीला मंगळवेढ्यातूनही ठोस पाठिंबा देण्यात आला.

# पंढरपूर आरटीओ कॅम्प मधील लायसन बुकिंग मर्यादा पुरवत २४० करावी, नगराध्यक्षा डॉ. प्रणिता ताई भालके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना वाहन चालवणे परवाना लायसन्स मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पंढरपूर आरटीओ कॅम्प मधील कच्चे उपके लायसन साठी असलेली ऑनलाइन बुकिंग ची मर्यादा पूर्वीप्रमाणे २४० इतकी करण्यात यावी अशी मागणी पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी राज्याचे परिवहन मंत्री मा.ना.श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

पंढरपूर येथे आरटीओ कॅम्पच्या माध्यमातून कच्चे उपके लायसन साठी नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिली जाते. पूर्वी कॅम्प मध्ये ऑनलाईन बुकिंग साठी २४० जागांची मर्यादा उपलब्ध होती मात्र सध्या आरटीओ विभागाकडून बुकिंग संस्थेत कपात



करण्यात आले असून कच्च्या लायसन्स साठी बहात्तर आणि पक्क्या लायसन्स साठी १२० जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे. पंढरपूर तालुक्याची लोकसंख्या सुमारे चार लाखाच्या आसपास असून वाहनांची संख्या आणि लायसन काढणाऱ्या नागरिकांची संख्या वर्षभर वाढत आहे. अशा परिस्थितीत सध्याची बुकिंग मर्यादा अपुरी पडत असल्याचे नागरिकांतून ऑनलाइन स्लॉट मिळवताना अडचणी निर्माण होत आहेत. अनेक नागरिकांनी वारंवार ऑनलाइन बुकिंग करण्याचा प्रयत्न करूनहीक्ष अपेक्षित वेळेत प्लॉट उपलब्ध होत नसल्याने त्याची मोठी गैरसोय होत आहे. लायसनची प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास नागरिकांना वाहन चालवताना कायदेशीर कारवाईचा सामना करण्याचा कायदेशीर कारवाई करण्याची सामना वेळ येऊ शकते. त्यामुळे नागरिकांची घरपे टाळण्यासाठी आरटीओ कॅम्प बुकिंग क्षमता वाढवणे गरजेचे असल्याचे पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भालके यांनी पत्रात नमूद केले आहे. याबाबत संभाजी विभागास आवश्यक आदेश देऊन पंढरपूर आरटीओ कॅम्प मधील बुकिंग क्षमता पूर्ववत वाढवावी जेणेकरून लायसन साठी प्रतीक्षा करणाऱ्या हजारो नागरिकांना दिलासा मिळेल त्याची होणारी दूर होईल अशी विनंती त्यांनी पुरवून परिवहन मंत्र्याकडे केले आहे.

# रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्या ड. माधवी निगडे, नगराध्यक्षा तथा मंदिर समिती पदसिद्ध सदस्या प्रणिता भालके यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वाखरी येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा बालगोपाळांचा उत्स्फूर्त सहभागाने मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भारतीय संस्कृती, सण आणि परंपरा यांची ओळख विद्यार्थ्यांना बालवयातच व्हावी तसेच विविध सण-उत्सवांमागील सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्ये त्यांच्यात रुजावीत या उद्देशाने शाळेत कृष्ण जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पारंपरिक पोशाखातील श्रीकृष्णरूपी बालगोपाळांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. राधेच्या वेशभूषेतील बालिकांनीही आपल्या मनमोहक रूपाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग





घेतला. यावेळी 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माचा प्रसंग अत्यंत रंजक कथारूपाने सांगितला. भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातील विविध प्रसंगांचा संदर्भ देत भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातून आपल्याला सत्याच्या मार्गावर चालण्याची, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि धर्म व न्यायाचे रक्षण करण्याची प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांनीही आपल्या जीवनात सत्य, न्याय आणि सदाचार या जीवनमूल्यांचा अंगीकार करावा असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

उपमुख्याध्यापिका रंजीता चौकेकर यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व सांगताना 'दहीहंडी हा केवळ उत्सव नसून, यामुळे एकमेकांविषयी प्रेम, सहिष्णुता, आपुलकी आणि सहकार्याची भावना निर्माण होते.' असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना मनोरंजनाबरोबरच जीवनमूल्यांचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कळंब येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अधिकाऱ्यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब दि.४(प्रतिनिधी) साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक (आर.एम) श्री. राजू चव्हाण, धाराशिव जिल्हा व्यवस्थापक श्री. गोविंद सांगवीकर तसेच कार्यालयीन सहाय्यक श्री. कुंडलिक सुर्यवंशी हे कळंब दौऱ्यावर आले असता त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या वेळी लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजी भाऊ गायकवाड तसेच शिवगर्जना सामाजिक संघ, डिकसळ यांच्या



वतीने साठे चौक, कळंब येथे त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी शिवगर्जना सामाजिक संघाचे अध्यक्ष सुजित बोराडे, उपाध्यक्ष प्रशांत माने, सचिव करण जाधव, तसेच दत्ता जाधव, विकास आंबिरकर, शरद जाधव, यश जाधव, अनिकेत जाधव, अविनाश गायकवाड, आदित्य जाधव, विकास गायकवाड, राम त्रिवेदी, पवन माने, किरण गायकवाड, दत्ता बाबर, कुलदीप बोधले, प्रतिक गायकवाड, लक्ष्मण गायकवाड यांच्यासह लहुजी शक्ती सेनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मा. आमदार बबनदादा शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आ. अभिजीत पाटील यांनी भेटून शुभेच्छा दिल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - सोलापूर जिल्ह्याची ज्येष्ठ नेते आदरणीय माजी आमदार बबनदादा शिंदे यांची निमगाव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन तब्येतीची विचारपूस करून स्वतःची काळजी घेण्याची विनंती केली.

काही महिन्यापूर्वी अमेरिकेत दादांवर हृदय प्रत्यारोपणाची अत्यंत महत्त्वाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली यावेळी त्यांच्या प्रकृतीची हस्ताने विचारपूस केली व शस्त्रक्रिया नंतर प्रकृती विषयी सविस्तर चर्चा केली.

तसेच दादांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नुकत्याच झालेल्या त्यानिमित्त प्रत्यक्ष भेटून मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन** — **फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचा उपक्रम**

# गुणवान व प्रामाणिक शिक्षकांचा सर्वत्र सन्मान होतो : प्रा. भीमाशंकर शेटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जगात गुणी, आचरणातून मूल्ये रुजविणाऱ्या व सामाजिक बांधिलकी मानून काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होतो व समाज त्यांच्याकडे आदराने पाहतो. परंतु त्याचबरोबर बदलत्या परिस्थितीत शिक्षकांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे व स्वतःला अद्यावत ठेवले पाहिजे असे प्रतिपादन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा व सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती यांच्यावतीने आयोजित व श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर यांच्या सहकार्याने गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एल.जी. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या सचिवा डॉ. नभा काकडे या होत्या.




यावेळी श्री. सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे विश्वस्त पशुपतीनाथ माशाळ, ड. आर. एस. पाटील, एफ.पी.ए.आय. सोलापूरशाखेचे चेअरपर्सन डॉ. गौरी कहाते, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील, पुरस्कार निवड समिती समन्वयक डॉ. श्रीकांत येळेगावकर, मंगळवेढा तालुक्यातील नंदूरगाव गावचे सरपंच श्रीशैल गोडसे, आप्पासाहेब चव्हाण, डॉ. राजीव प्रधान, डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. विजया महाजन, सपना चिट्टे, माजी चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, संगमेश्वर रघोजी, सिद्राम कोतली, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षक मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे यांच्याहस्ते गुणवंत शिक्षकांचा सन्मानपत्र, शाल व बुके देवून सन्मान करण्यात आला.

**यांचा झाला सन्मान-**

श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. नागनाथ धायगोडे, द. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनल सोसायटीचे उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक ए. गफूर ए. गनी सगरी, सु. रा. मुलींची सेवासदन प्रशालेच्या सहशिक्षिका अश्विनी मोरे (वाघमोडे),, श्रीमती कमला नेहरू प्राथमिक मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा राघवेंद्र जहागीरदार, श्री. सुशीलकुमार शिंदे भा.वि. इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका पूनम गुरुनाथ सोनटकले (पैकेकरी), यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी गुणवंत शिक्षकांपैकी प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण व अश्विनी मोरे-वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्तकरताना डॉ. नभा काकडे म्हणाल्या की, विश्वासाला पत्र असल्यामुळेच शिक्षकाचा शासनाकडून, जनगणना, निवडणुकीच्या कामात, एस.आय. आर सर्वेक्षण, साथरोग नियंत्रणात सहभाग घेतला जातो. शिक्षकांनी विचार स्वातंत्र्यावर भर दिल्यास विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता दूर होऊ शकेल.

सुरुवातीला मान्यवरांचा परिचय प्रा. सोनाली पाटील यांनी केला तर गुणवंत शिक्षकांचा परिचय डॉ. आयेशा रंगरेज व डॉ. विजया महाजन यांनी केला. मान्यवरांचे स्वागत डॉ. गौरी कहाते यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अमृता निंबार्गीकर यांनी केले तर आभार सपना चिट्टे यांनी मानले.

# ‘एक गाव, एक गणपती’सह डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा..!

## निफाड पोलिसांची पोलीस पाटलांच्या बैठकीत मार्गदर्शक सूचना; अनावश्यक खर्च-मतभेद टाळण्यास होणार मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित रा- हावी, गणेशोत्सव शांततेत व उत्स- ाहपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, यासाठी निफाड पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांची विशेष बैठक पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत गणेशोत्सवाच्या नियोजनाबाबत विविध महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.





बैठकीस निफाड पोलीस ठाण्याच्या नवनियुक्त पोलीस निरीक्षक सारिका आहिरराव तसेच नुकतीच चांदवड येथे बदली झालेले पोलीस निरीक्षक अभिजित सोनवणे उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या काळात गावागावांत शांतता व सामाजिक सलोखा कायम राहावा, यासाठी पोलीस पाटलांनी गावपातळीवर नागरिक, गणेश मंडळे तसेच ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.यंदाचा गणेशोत्सव शक्यतो ‘एक गाव, एक गणपती’ या संकल्पनेतून साजरा करण्यावर पोलिसांनी विशेष भर दिला. या माध्यमातून गावातील विविध मंडळे व नागरिकांनी एकत्र येऊन सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सलोखा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना करण्यात आली. एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा केल्यास अनावश्यक स्पर्धा, खर्च तसेच मंडळांमधील मतभेद टाळण्यास मदत होऊन उत्सवाला अधिक विधायक स्वरूप प्राप्त होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शक्यतो डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आव- ाहन पोलिसांनी केले. पारंपरिक वाद्ये, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर उपक्रम आणि सामाजिक संदेश देण- ारे कार्यक्रम यांना प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले. पोलीस पाटलांनी आपल्या गावातील गणेश मंडळांशी समन्वय साधून डीजेमुक्त उत्सवासाठी जनजागृती करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, व्यसनम ुक्ती, रक्तदान, वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक उपक्रमांशी जोडण्याची गरज असल्याचेही बैठकीत गणेशोत्सव काळात गावातील संवेदनशील ठिकाणे, मिरवणुकीचे मार्ग, गद- ींची ठिकाणे आदींबाबत पोलीस प्रशासनाला वेळोवेळी माहिती देऊन सहकार्य करावे. कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवता त्याची सत्यता पडताळून पाहावी तसेच सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामस्थांनी पोलिसांशी सम न्वय ठेवावा, असे आवाहन करण्यात आले.गावातील गणेश मंडळांनी उत्सवाच्या काळात शिस्त, शांतता आणि सामाजिक सलोखा राखत प्रशासनाला सहकार्य करावे, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.नवनियुक्त पो- लीस निरीक्षकांचा सत्कार

दरम्यान, निफाड पो- लीस ठाण्याच्या नवनियुक्त पोलीस निरीक्षक सारिका आहिरराव यांचा पोलीस पाटलांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच निफाड पो- लीस ठाण्यात कार्यरत असताना विविध उपक्रमांमध्ये सहकार्य केलेले आणि नुकतीच चांदवड येथे बदली झालेले अभिजित सोनवणे यांचाही पोलीस पाटलांच्या वतीने सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीमुळे पोलीस प्रशासन आणि गावपातळीव- रील यंत्रणा यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून, निफाड तालुक्यात शांतता, सामाजिक सलोखा आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी दिसून आले.यावेळी लक्ष्मण आहेर, संजय तळेकर, रवींद्र शिंदे, भाग्यश्री बोरसे, रोहिणी शिंदे, सविता कुंदे, सोपान साताळे, अभिजीत पडोळ, विश्वास शिंदे, सदाशिव सानप,गोरक्षनाथ डांगले, मधुकर कोकाटे, आशा निकम, प्रशांत पुंड, अरुण गोसावी, भारत वहीकर, केदाबाई अहिरे, संतोष अस्वले हे पोलीस पाटील उपस्थित होते

# अक्कलकोट गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरोधात शिक्षक समन्वय समिती आक्रमक; सीईओंकडून योग्य कार्यवाहीचे आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुका गटशिक्षणाधिकारी यांच्या कथित मनमानी कारभाराच्या विरोधात अक्कलकोट तालुका सम न्वय समितीच्या वतीने तालुका सभापती व उपसभापती यांना निवेदन देण्यात आले होते.

या प्रकरणाची पुढील दखल घेत आज जिल्हा समन्वय समितीचे सदस्य श्री. वीरभद्र यादवाड यांच्या वतीने सोल- ापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय श्री. कुशल जैन साहेब यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती व शिक्षकांच्या अडचणींबाबत सविस्तर माहिती सीईओ साहेबांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत घडलेला वृत्तांत ऐकून घेतला असून, संबंधित प्रकरणाची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुशल जैन यांनी दिले.

शिक्षकांच्या न्याय्य म ागण्यांसाठी समन्वय समितीच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू रा- हणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.



# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारीपदी श्रीकांत यादव यांची नियुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी पदी विधी व न्याय विभागाने कक्षा अधिकारी श्रीकांत यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे याबाबतचे परिपत्रक आपल्या प्रशासन विभागाच्या उपविभागाने कळवले आहे.





मंदिर समितीचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची कल्याण डोंबिवली येथे अधिकारी म्हणून बदली करण्यात आली होती मात्र आषाढी एकादशी यात्रेच्या कालावधीमुळे त्यांच्या बदलेल्या तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती यात्रा झाल्याने पूर्ण झाल्यावर शेळके यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी कोणाला अधिकाऱ्याची नियुक्ती होणार याबाबत उत्सुकता होती अखेर निधी व न्याय विभागातील कक्षा अधिकारी श्रीकांत यादव यांची पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समि तीच्या कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती केली आहे.

त्यामुळे मंदिर समितीच्या प्रशासन सीए कारभाराची जबाबदारी आता यादव यांच्याकडे येणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या माध्यमातून भाविकांच्या सुविधा धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन तसेच मंदिर परिसरातील विविध प्रशाकीय कामकाज पाहिजे जाते. नव्या कार्यकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीनंतर मंदिर समि तीच्या कामकाजाला कोणती दिशा मिळते याकडे पंढरपूरकरांचे लक्ष लागले आहे.

### श्रावण शुक्रवार निमित्त रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान

**श्रावण शुक्रवार पर्वानिमित्त श्री. विठ्ठल व रुक्मिणी मंदिरात रुक्मिणी मातेस आकर्षक, पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. या पारंपरिक अलंकारांमुळे रुक्मिणी मातेचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, ताणवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, जवेच्या माळा,लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. याबाबतची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.**



# कळंब तालुक्यातील मंगरूळ परिसरात दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार अनुदान द्या : शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील मंगरूळ परिसरात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने पेरणी केलेले पीक धोक्यात आले आहे. शेतकऱ्यांनी उसनव- ारी करून पेरणी केली असून आता दुबार पे- रणीचे संकट उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर मंगरूळ व कळंब परिसरात तात्काळ दुष्काळ जाहीर करून प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये विमा नुकसान भरपाई व अनुदान द्यावे, अशी मागणी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या व मंगरूळ येथील समस्त दुष्काळग्रस्त शेतकऱ्यां वतीने कळंब तहसील चे नायब तहसीलदार राजेश तापडीया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दि.४ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मंगरूळ परिसरातील सर्व शेतकरी वर्गाने कर्ज काढून खरीपाची पेरणी केली होती. पेरणी होऊन १ महिना १५ दिवस उलटले तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शासनाने या बाबीची गंभीर दखल घेऊन पिक विमा कंपनीला आदेश द्यावेत.

तसेच खरीप २०२४ चा धाराशिव जिल्ह्यासाठी पोस्ट हार्वेस्टिंगचा ११६ कोटी रुपयांचा पिक विमा मंजूर झाला असून तो अद्याप शेतकऱ्यांना मिळालेला नाही. तो विमा व्याजासह लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर शेतकरी अविनाश तानाजी रितापुरे,मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे,पंचमुखी शेतकरी बचत गटाचे सदस्य यांच्या सह शेतकऱ्यांच्या स्वाक्षर्या आहेत. शासनाने लवकर निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इश- ाराही शेतकऱ्यांनी यावेळी दिला आहे.

**आरोग्य तपासणी,नवजात बालकासाठी बेबी कीट,संसार उपयोगी भांडी वाटप**

**गर्भवती महिलांना मायेची ओटीभरणी**

# नारायण चिंचोलीत मा.आ.प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवस विविध विधायक उपक्रमांनी साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त गोकुळाष्टम ीच्या निमित्ताने शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ रोजी नारायण चिंचोली (ता. पंढरपूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या विधायक उपक्रमातून माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांना शुभेच्छा दिल्या.या निमित्त आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिरातून ग्रामस्थांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. सम ाज प्रबोधन: राष्ट्रीय भारूडकार चंदाताई तिवाडी यांच्या लोककला व समाज प्रबोधनपर कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. माता व बालकल्याण: कार्यक्रमादरम्यान गर्भवती महिलांना मायेची ओटीभरणी करण्यात आली तसेच नवजात बालकास बेबी कीटचे वाटप करण्यात आले.

महिला सन्मान व उपयोगी वस्तू वाटप: महिलांना संसार उपयोगी भांडी वाटप करण्यात आली, तसेच सर्व शासकीय महिलांचा साडीचोळी देऊन विशेष सन्मान करण्यात आला. गुणगौरव: विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा व स्पर्धा परीक्षांमधील गुणवंतांचा बक्षीस वितरण करून गौरव करण्यात आला.या कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थान कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे (सर) यांनी भूषवले. तर कृषि उत्पन्न बाजार समि ती, पंढरपूरचे सभापती हरिष गायकवाड हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पंचायत समिती, पंढरपूरचे सभापती डॉ. शुभम आगावणे आणि कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक मा. लक्ष्मण (तात्या) धनवडे प्रम ुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाचे आयोजन नारायण चिंचोली ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. नर्मदा लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पांडुरंग परिवार, तसेच नारायण चिंचोली येथील पदाधिकारी व अधिकारी यांनी केले होते.यावेळी लक्ष्मण कोले , विष्णू माने,भास्कर गुंड, दत्तात्रय मस्के, माऊली मस्के, माऊली बरडे , धर्मराज नलावडे, लहू नलावडे,विजय कोळेकर शिवाजी भोसले, मुकुंद घाडगे, श्रीधर कोळेकर, बाळू बनसोडे, दत्ता बनसोडे, शिव- ाजी वसेकर, सतीश वसेकर,बापू कोळेकर, पोपट पाटील, पांडुरंग हराळे, दादा जानकर, बंडू मस्के, अण्णा डुबल, बाळू वसेकर, संदीप कोले , दत्त- ात्रय गुंड, सुरेश डुबल, हनुमंत सोनवर, मारुती चव्हाण, सहदेव कोले,बळवंत धनवडे, विजय कोळेकर, सौदागर गुंड, आप्प- ासाहेब वाघमोडे, नारायण गुंड, साधू नलवडे, वैजनाथ मस्के, तानाजी वसेकर, पप्पू कंदारे, भाऊसाहेब माने, सचिन घाडगे, सुनील माने, सचिन भडकवाड, विविध कल्याणकारी उपक्रमांम ुळे आमदार प्रशांत परिचारक यांचा वाढदिवस यंदा नारायण चिंचोली येथे अतिशय उत्साही व सामाजिक वातावरणात पार पडला.



